25 JUL 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुरक्षारक्षक, नागरिक बनले 'जीवनरक्षक'

## शिवाजी विद्यापीठात घेतले प्रथमोपचाराचे धडे : बालरोगतज्ज्ञ संघटनेचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारी सकाळी सुरक्षारक्षक आणि नागरिकांनी जीवनरक्षक प्रथमोपचार पद्धतीचे धडे घेतले. त्यांना डॉक्टरांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. भारतीय आणि कोल्हापूर बालरोगतज्ज्ञ संघटनेतर्फे १७ जुलैपासून जीवन संजीवनी सप्ताह साजरा केला जात आहे. त्याचा समारोप विद्यापीठात करण्यात आला.

अपघाताने कोणत्याही व्यक्तीचे हृदय बंद पडले, त्याला श्वास घेणे शक्य होत नाही, अशावेळी त्याचा जीव वाचविणे आवश्यक असते. याबाबत समाजातील विविध घटकांना प्रशिक्षण, मार्गदर्शन देण्यासाठी बालरोगतज्ज्ञ संघटनेतर्फे जीवन संजीवनी सप्ताह आयोजित केला. याअंतर्गत विद्यापीठात रविवारी दोन टप्प्यांमध्ये जीवनरक्षक प्रथमोपचार पद्धती चळवळीचे राष्ट्रीय निमंत्रक डॉ. नरेंद्र नानिवडेकर, मार्गदर्शक डॉ. निवेदिता पाटील आणि कोल्हापूर बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या सचिव शिल्पा हिरूगडे, डॉ. अमोल गिरवलकर, विनिता रानडे यांनी प्रशिक्षण दिले. प्रात्यक्षिकांसह त्यांनी मार्गदर्शन केले.



कोल्हापुरात रविवारी सुरक्षारक्षक, नागरिकांना प्रथमोपचार पद्धतीचे प्रशिक्षण डॉ. नरेंद्र नानिवडेकर, निवेदिता पाटील, शिल्पा हिरुगडे, अमोल गिरवलकर यांनी दिले.

### रुग्णाचा जीव वाचविता येऊ शकतो...

अचानकपणे हृदयक्रिया बंद पडलेल्या व्यक्तीच्या छातीवर विशिष्ट पद्धतीने दाब देऊन, कृत्रिम श्वासोच्छ्वास देऊन, एईडी यंत्राचा वापर करून हृदयक्रिया कृत्रिमरीत्या सुरु ठेवता येते. त्यामुळे या जीवनरक्षक प्रथमोपचार पद्धतीचे प्रशिक्षण नागरिकांना असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने ही मोहीम राबविली, अशी माहिती डॉ. हिरुगडे यांनी दिली.

25 JUL 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### शिवाजी विद्यापीठात ॲथलेटिक्स स्पर्धा रंगली : ओंकार पन्हाळकर, वृषाली जगदाळेसह १८ जणांची राज्य स्पर्धेसाठी निवड

# धावणे, गोळाफेक, लांबउडीत खेळाडूंचा लागला चांगलाच कस

लोकमत न्यूज नेटवर्क,
**कोल्हापूर :** कोरोनानंतर तब्बल दोन वर्षांनी शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा शुक्रवार ते रविवार दरम्यान रंगली. धावणे, लांबउडी, उंचउडी, गोळाफेक या क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंचा कस लागला. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी ओंकार पन्हाळकर, वृषाली जगदाळे यांच्यासह १८ खेळाडूंनी दमदार कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जिल्हा संघात स्थान मिळवले.

या स्पर्धेसाठी कोल्हापूर शहर, राधानगरी, चंदगड, गडहिंग्लज, शिरोळ, हातकणंगले, करवीर, आदी परिसरातील सुमारे एक हजार खेळाडू सहभागी झाले. १४, १६, १८, २० वर्षांखालील मुले आणि मुलींच्या गटातील धावणे, ३ आणि ५ हजार मीटर चालणे, बांबू उडी, तिहेरी उडी, लांबउडी, उंचउडी, गोळा, भाला, थाळीफेक, आदी प्रकारांतील स्पर्धा झाल्या. त्यातून ओंकार पन्हाळकर, प्रथमेश केसरे (३००० मीटर धावणे), सुजित तिकोडे, आदित्य पाटील, अथर्व मोरे, ऋतिक वर्मा (२००० मीटर धावणे), वृषाली जगदाळे, मृणाली कोळी (बॉल थ्रो), खुशबू खान, प्राजक्ता उडदे (४०० मीटर धावणे), रेशमा चव्हाण, संस्कृती वराड (६०० मीटर धावणे), स्वाती कल्लोळे, वैभवी कुंभार (२००० मीटर धावणे), पूर्वा शेवाळे, गौरी वगरे, सृष्टी रेडेकर, वृषाली विभूते (३००० मीटर धावणे) यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धेचे उद्घाटन कोल्हापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव डॉ. सुरेश फराकटे यांच्या हस्ते झाले.

यावेळी योगेश मांगोरे-पाटील, सतीश पाटील, कृष्णात लाड, रामदास फराकटे, सुभाष पोवार, नवनाथ पुजारी, अमोल आळवेकर, सुभाष माने उपस्थित होते. परीक्षकांचे ४० जणांचे पथक स्पर्धेसाठी कार्यरत होते.



शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत शुक्रवारी ६० मीटर धावणे स्पर्धेत खेळाडूंमध्ये चुरस रंगली. (छाया : नसीर अत्तार)



सिंथेटिक ट्रॅकवर जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत शुक्रवारी लांबउडी प्रकारात खेळाडूंनी कौशल्य पणाला लावले.

> या जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेतील प्रत्येक प्रकारामधील प्रथम, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली आहे. त्यांची नावे सोमवारी जाहीर केली जातील.
>
> -डॉ. सुरेश फराकटे

पुढारी

# नवीन शैक्षणिक धोरणासाठी मनुष्यबळ व्यवस्थापकांचे योगदान महत्त्वाचे : डॉ. गुरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत उद्योग क्षेत्रातील मानव संसाधन व्यवस्थापकांनी सहभागी होऊन नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी सकारात्मक भूमिका बजावावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए.एम. गुरव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यातील उद्योजक व मानव संसाधन व्यवस्थापक यांच्यासाठी 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०: उद्योजक व मानव संसाधन व्यवस्थापक यांची भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. गुरव बोलत होते. यावेळी संजय बेनके, संघसेन जगतकर, अनंत पाटील उपस्थित होते.

डॉ. गुरव म्हणाले, येत्या शैक्षणिक वर्षापासून नव्या शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शिवाजी विद्यापीठ तयार असून विद्यार्थ्यांना अधिकाधिक सक्षम व उद्योगक्षम बनविण्यासाठी प्रयत्नशील आहे. नवीन शैक्षणिक धोरणात समाजातील अनेक घटकांचा समावेश आहे.

25 JUL 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नॅनो सायन्स, टेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरच्या संधी' विषयावर २७ जुलैपासून व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे २७ ते ३० जुलै या कालावधीत 'नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरच्या संधी' विषयावर मोफत ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. व्याख्यानमाला बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आहे. यात तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी या विशेष संधीचा विद्यार्थी, पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.